प्रेस नोट दि.१८/०६/२०१९

<u>कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर</u>

<u>हरवलेले  पैसे व सोन्याचे दागिन्यांची बॅग लहान मुलाने केली प्रामाणिकपणे परत</u>

महिला नामे. रेखा सुर्यकांत सारुळकर वय. ६४ वर्षे व्यवसाय. गृहीणी रा. फलॅट नंबर १५०६ फेज २ परमारपार्क,वानवडी पुणे यांची दि. १६/०६/२०१९ रोजी रात्री ०८/३० वा. चे सुमारास त्यांचे जावई सोबत ॲक्टीव्हा गाडीवरुन कुमार पृथ्वी येथुन जात असताना युनिटी पार्क रोडवर त्यांचेकडील एक ३ तोळे सोन्याचे मंगळसुत्र,१ रेड मी नोट ५ कंपनीचा मोबाईल हॅण्डसेट,९०,०००/- रुपये रोख रक्कम,आधारकार्ड इत्यादी वस्तु असलेली बँग कोठेतरी पडुन गहाळ झालेबाबत तक्रार देण्यासाठी कोंढवा पोलीस स्टेशन येथे आलेल्या होत्या.

सदर बॅगचा तक्रारदार महिला यांचेसह कोंढवा पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील स्टाफसह बँग गहाळ झालेल्या परिसरातील सी.सी.टि.व्ही चेक करुन शोध सुरु केला असता,दि. १७/०६/२०१९ रोजी रात्रो २३/३० वा. चे सुमारास मुलगा नामे. आक्रम शेख वय. १५ वर्षे रा. संत ज्ञानेश्वर नगर कोंढवा बु पुणे याने तक्रारदार महिला यांचे बॅगमध्ये असलेल्या डायरीमधुन मुलगी दिपाली सुर्यकांत सारुळकर यांचा मोबाईलनंबर घेवुन त्यांना फोन करुन तुमची बँग माझ्याकडे आहे असे कळविले.त्यानंतर कोंढवा पोलीस स्टेशनकडील तपास पथकातील पोलीस नाईक कुंभार,उमाकांत स्वामी व हणुमंत कांबळे हे सदर मुलाचे राहते पत्यावर जावुन त्याचा शोध धेवुन त्याचेकडुन तक्रारदार महिलेची गहाळ झालेली बॅग ताब्यात घेवुन सदरची बँग तक्रारदार महिलेस सुस्थितीत ताब्यात दिलेली आहे. त्याचप्रमाणे मुलगा नामे. आक्रम शेख याचे प्रामाणिकपणाचे कौतुक करणेत आलेले आहे.

सदरची कामगिरी मा. श्री.प्रकाश गायकवाड साो.पोलीस उप आयुक्त परिमंडळ – ५,मा.सुनिल देशमुख साो.सहा पोलीस आयुक्त,हडपसर विभाग पुणे शहर,श्री.अनिल पाटील,वरिष्ठ पोलीस निरीक्षक,श्री. महादेव कुंभार, पोलीस निरी.गुन्हे यांचे सुचना व मार्गदर्शनाखाली पोलीस उप निरीक्षक संतोष शिंदे,पोलीस हवालदार जगताप,पोलीस नाईक योगेश कुंभार, उमाकांत स्वामी व हणुमंत कांबळे यांचे पथकाने केली आहे.

( अनिल पाटील )
वरिष्ठ पोलीस निरीक्षक
कोंढवा पोलीस स्टेशन,पुणे शहर